**Green Skill Development Programme (GSDP) अंतर्गत लोकजैवविविधता नोंद वही (PBR) हा अभ्यासक्रम बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS), मुंबई आयोजित करत आहे त्या संदर्भातील विस्तृत माहिती प्रश्न- उत्तरांच्या स्वरुपात देण्यात आलेली आहे.**

प्रश्न १) या अभ्यासक्रमाचे नाव काय आहे?

जैविक विविधता कायदा 2002 अंतर्गत लोकजैवविविधता नोंद वही तयार करणे (PBR) आणि जैवविविधता व्यवस्थापन समित्यांचे प्रबंधन (BMC) प्रमाणपत्र अभ्यासक्रम.

प्रश्न २) हा अभ्यासक्रम कोण घेणार आहे ?

बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS) हा अभ्यासक्रम पर्यावरण, वन आणि हवामान बदल (MoEF&CC), नवी दिल्ली, भारत सरकार, पर्यावरण माहिती केंद्राअंतर्गत ग्रीन स्किल डेव्हलपमेंट प्रोग्रामच्या (GSDP) मानदंडानुसार घेण्यात येणार आहे.

प्रश्न ३) या अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षक कोण असेल?

BNHS चे तज्ञ हे सदर अभ्यासक्रम घेणार आहेत तसेच आवश्यकतेनुसार इतर संस्थांच्या तज्ञांना विशिष्ट सत्रांसाठी बोलावले जाईल.

प्रश्न ४) हा शासकीय अभ्यासक्रम किंवा बीएनएचएसचा खाजगी अभ्यासक्रम आहे काय?

अभ्यासक्रम BNHS च्या तांत्रिक गटाद्वारे विकसित करण्यात आला आहे आणि पर्यावरण, वन आणि हवामान बदल (MoEF&CC), नवी दिल्ली, भारत सरकार, पर्यावरण माहिती केंद्राद्वारे मान्यताप्राप्त आहे. सदर अभ्यासक्रमाचे संचालन महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर यांच्या मदतीने आयोजित करण्यात येत आहे.

प्रश्न ५) हा अभ्यास कुठे आयोजित केला जाईल?

हे प्रशिक्षण वन रक्षक प्रशिक्षण विद्यालय (फॉरेस्ट गार्ड ट्रेनिंग स्कूल), शहापूर, जि. ठाणे, महाराष्ट्र येथे  हॊणार आहे.

प्रश्न ६) या अभ्यासक्रमाचा कालावधी किती आहे?

हा अभ्यासक्रम एक महिना व पूर्ण निवासी अभ्यासक्रम आहे. दिनांक १२ जुलै ते ११ ऑगस्ट २०१९ च्या दरम्यान हे प्रशिक्षण होणार आहे

प्रश्न ७) या अभ्यासक्रमामध्ये कोण सहभागी होऊ शकेल?

निसर्ग संवर्धन व संरक्षण या विषयात उत्साही असणारी व्यक्ती आणि जैवविविधता संबंधित घटकांच्या आधारे शाश्वत विकासासाठी कार्यरत असलेल्या कोणत्याही व्यक्तीस या अभ्यासक्रमासाठी नोंदणी करता येईल.

प्रश्न ८) एखादी स्वयंसेवी संस्था अथवा अशासकीय संस्था किंवा संघटना (NGO) या प्रशिक्षणासाठी आपल्या प्रतिनिधीला पाठवू शकतात का?

हो निश्चितच, जैवविविधता संरक्षण क्षेत्रामध्ये काम करणारी कोणतीही स्वयंसेवी संस्था अथवा अशासकीय संस्था त्यांचे प्रतिनिधी पाठवू शकते किंवा या अभ्यासक्रमासाठी ते एखाद्या व्यक्तींची देखील शिफारस करु शकतात. संस्थांना अशा उमेदवारांचा तपशील देणे आवश्यक राहील. अशा उमेदवारांची मौखिक किवा भ्रमणध्वनी (मोबाईलवर) च्या माध्यमातून मुलाखत घेण्यात येईल.

प्रश्न ९) या प्रशिक्षणास उपस्थित राहण्यासाठी किमान निकष काय आहेत?

किमान १० वी किंवा १२ वी पास. संबंधीत व्यक्तीस सुलभ वाचन, लेखन, व वकृत्व आले पाहिजे व महत्वाचे म्हणजे त्यास अन्य व्यक्तींशी संवाद साधता आला पाहीजे. प्रशिक्षण कार्यक्रमासाठी 10 वी नंतर अर्धवट शिक्षण सोडलेल्यांचा देखील विचार करण्यात येईल परंतु त्यांनी मुलाखत यशस्वीरित्या पूर्ण करायला हवी. निवड प्रक्रीयेत आदिवासी बहुल भागातील जैवविविधता संरक्षण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या लोकांना प्राधान्य देण्यात येईल.

प्रश्न १०) उमेदवारांची निवड करण्याची प्रक्रिया काय आहे?

उमेदवारांची निवड हि प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या पद्धतीने व पुढे दिलेल्या अटींनुसार मौखिक किंवा भ्रमणध्वनीच्या माध्यमातून मुलाखत घेण्यात येईल.

प्रश्न ११) उमेदवारासाठी निवड मानदंड काय असेल?

खालील मुद्द्यांनुसार उमेदवारांची निवड केली जाईल

अ) मराठी भाषा उत्तमपणे वाचता लिहता व बोलता येते का?

ब) उमेदवाराकडे स्थानिक लोकांशी संवाद साधण्याची चांगली क्षमता आहे का?

क) या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी उमेदवार एक महिन्यापर्यंत राहू शकेल काय?

ड) अभयारण्य किंवा राष्ट्रीय उद्यान इत्यादि क्षेत्रातील आदिवासी श्रेणीचा आहे आणि त्यांची उपजीविका इको-टुरिझमच्या माध्यमातून पूर्ण केली जाते किंवा ज्यांचे आश्रयस्थान अभयारण्यांमुळे प्रभावित झालेले आहे?

ई) उमेदवार आधीपासुन पर्यावरण अथव जैवविविधता संरक्षण व संवर्धन क्षेत्रामध्ये संदर्भातील कामे करीत आहे?

प्रश्न १२) या अभ्यासक्रमामध्ये किती जागा उपलब्ध आहेत?

या अभ्यासक्रमामध्ये एकूण ३० जागा उपलब्ध आहेत.

प्रश्न १३) इच्छुक व्यक्तीला एखादा अर्ज पाठवायचा किंवा फोनवर बीएनएचएस संस्थेशी संपर्क साधण्याची आवश्यकता आहे का?

इच्छुक व्यक्ती दूरध्वनीच्या माधमातून BNHS येथील पर्यावरण माहिती केंद्रातील अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात किंवा ईमेलच्या माध्यमातून अर्ज करू शकतात. तथापि, मौखिक मुलाखत दूरध्वनीद्वारे घेतली जाईल.

प्रश्न १४) अर्ज करण्याची अंतिम तारीख कोणती आहे आणि उमेदवारांना पुष्टी कधी मिळेल?

अर्ज करण्याची अंतिम तारीख २२ जून आहे; मौखिक मुलाखत दूरध्वनीद्वारे २६ जून २०१९ घेण्यात येईल.

प्रश्न १५) अभ्यासक्रम शुल्क आणि इतर खर्च काय आहे?

अभ्यासक्रमासाठी कुठलेही शुल्क आकारण्यात येणार नाही. प्रशिक्षण कालावधी दरम्यानचा संपूर्ण खर्च BNHS द्वारे करण्यात येईल.

प्रश १६) अभ्यासक्रमाच्या कालावधीत ( वरील उल्लेख केल्याव्यतिरिक्त) इतर कोणताही खर्च असेल काय?

अभ्यासक्रमाच्या कालावधीत अतिरिक्त कुठलाही खर्च होणार नाही.

प्रश्न १७) या प्रशिक्षण अभ्यासक्रमामध्ये प्रात्याक्षिक आहे का?

अभ्यासक्रमादरम्यान सर्व प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण स्थळापासून जवळच असलेल्या एखाद्या गावाला भेट देऊन प्रत्यक्ष लोकजैवविविधता नोंद वही तयार करतील.

प्रश्न १८) दररोज अभ्यासक्रमाचा कालावधी किती तासांचा असेल?

प्रशिक्षण दररोज ८ तासांपर्यंत आणि प्रात्याक्षिक एक ते दोन तासांपर्यंत वाढू शकते.

प्रश्न १९) BNHS कडून सहभागींना अभ्यासक्रमामध्ये काय साहित्य दिले जातील?

सर्व सहभागींना बॅग, वही, पेन आणि टोपी देण्यात येईल. सर्व अभ्यासक्रम साहित्य मराठी मध्ये असेल.

प्रश्न २०) प्रशिक्षणार्थी सोबत काय आणणे अपेक्षित आहे?

सहभागीने अभ्यासक्रम कालावधीत पुरेसे कपडे आणि वैयक्तिक वस्तू आणल्या पाहिजेत. आधार / निवडणूक कार्ड इत्यादिसारख्या छायाचित्र ओळखपत्र. पावसाळा लक्षात घेता छत्री किंवा रेनकोट सोबत असणे गरजेचे आहे. नोंदणीच्या वेळी प्रत्येक सहभागीला तात्पुरते ओळखपत्र देण्यात येईल.

प्रश्न २१) प्रशिक्षणासाठी निवड झाल्यानंतर प्रवासाची व्यवस्था काय असेल?

प्रशिक्षणार्थींनी शहापुरपर्यंत पोहोचण्यासाठी स्वतःची व्यवस्था स्वतः करावी. वातानुकूल विरहित बस (Non-AC bus)/द्वितीय श्रेणी स्लीपर ट्रेनने कमीतकमी अंतर मार्गाने प्रवास केलेल्या उमेदवारांना तिकीटाचे शुल्क / प्रवासाची रक्कम परत केली जाईल.

प्रश्न २२) एखादा अभ्यासक्रम मधुनच सोडुन जाऊ शकतो का? किंवा प्रशिक्षणादरम्यान एखाद्या व्यक्तीस सुट्टी मिळू शकते का?

अभ्यासक्रमादरम्यान कोणालाही मधुनच सोडुन जाण्याची परवानगी देण्यात येणार नाही (वैद्यकीय किंवा इतर अनपेक्षित परिस्थितीत वगळता). या प्रशिक्षणादरम्यान कोणासही सुट्टी मिळणार नाही. अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवारांनाच सहभागी प्रमाणपत्र दिले जातील.

प्रश्न २३) या अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश काय आहे?

लोकजैवविविधता नोंदणी वही (PBR) तयार करण्यात पारंगत होणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. या व्यतिरिक्त, पारंपारिक माहितीचे दस्तऐवजीकरण, वनस्पती, प्राणी आणि कीटक प्रजातींची ओळख; जैवविविधतावारसा स्थळे (BHS) स्थापनेची प्रक्रिया; पंचायत विस्तार ते अनुसूचित क्षेत्र PESA आणि वन हक्क कायदा (FRA) समित्यांसह समन्वय; ग्राम पंचायतसाठी जैवविविधता व्यवस्थापन योजनांचा विकास; जैवविविधता संसाधनांच्या व्यावसायिक वापरातुन मिळणार्या फायद्याचे समन्यायी वाटप प्रक्रीया (ABS Mechanism) ; जैवविविधता व्यवस्थापन समित्यांची एकूण कार्यप्रणाली; जैवसंसाधनांचे स्त्रोत व त्यांचे व्यवस्थापन; धोक्यात असलेल्या प्रजातींची आणि त्याच्या संरक्षणाची ओळख इ.

प्रश्न २४) हा अभ्यास पूर्ण केल्यावर नोकरीच्या संधी काय आहेत?

यशस्वी उमेदवार ग्रिड बेस्ड डिसिसन सपोर्ट सिस्टम (GRIDSS)/बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS)/ झुऑलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया(ZSI)/ वन्यजीव अभ्यारण्य / राष्ट्रीय उद्याने / संरक्षित क्षेत्र / पक्षी अभयारण्य / पाणथळ जागा / राज्य जैवविविधता मंडळ / संरक्षण शिक्षण केंद्र (CEC) / निसर्ग माहिती केंद्र/ पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) / पक्षी पर्यटन / स्वयंरोजगारा या सारख्या विषयांमध्ये / संस्थांमध्ये / त्यांच्या सोबत काम करु शकतात.

प्रश्न २५) अभ्यासक्रमाच्या शेवटी, सहभागींना कोणत्या प्रकारचे प्रमाणपत्र दिले जाईल?

प्रत्येक यशस्वी विद्यार्थ्याला पर्यावरण माहिती केंद्र, MoEF&CC, भारत सरकारचे प्रमाणपत्र मिळेल.